**<u>ठळक बातम्या</u>**

- राष्ट्रपतींच्या हस्ते दुसऱ्या टप्प्यातल्या पद्म पुरस्कारांचं वितरण/ अलका याज्ञिक, रोहित शर्मा, सतीश शहा यांचा समावेश

- राज्यातल्या प्रत्येक पोलीस ठाण्यात अंमली पदार्थविरोधी कृती दलाची स्थापना करण्याचं मुख्यमंत्र्यांचं विधानसभेत आश्वासन

- विदर्भातल्या प्रत्येक जिल्ह्यात व्याघ्रप्रकल्प तसंच कोकण, पश्चिम महाराष्ट्र आणि खानदेशातल्या प्रत्येक जिल्ह्यात बिबट्या सफारी सुरू करण्याची वनमंत्र्यांची घोषणा

- विधानपरिषदेच्या नवनिर्वाचित १७ आमदारांनी घेतली सदस्यत्वाची शपथ

**आणि**

- राज्यात पुढचे दोन दिवस मान्सूनची आगेकूच सुरू राहणार

**<><><><><>**

राष्ट्रपती भवनात आज राष्ट्रपती द्रौपदी मूर्मू यांच्या हस्ते दुसऱ्या टप्प्यातले पद्म पुरस्कार प्रदान करण्यात आले. पी. नारायणन यांना साहित्य आणि शिक्षण या क्षेत्रासाठी आणि माजी न्यायमूर्ती के. टी थॉमस यांना समाज कार्यांसाठी पद्मविभूषण देण्यात आला.

क्रीडाक्षेत्रासाठी, टेनिसपटू विजय अमृतराज, हॉकी खेळाडू सविता पुनिया यांना पद्मभूषण पुरस्कार प्रदान करण्यात आला. कलाक्षेत्रातील पद्मभूषण पुरस्कार संगीतकलेसाठी अलका याज्ञिक तर लोककलेसाठी वेलापल्ली नटेशन आणि अभिनयासाठी मल्याळम अभिनेते माम्मूटी या मान्यवरांना यावेळी प्रदान करण्यात आले.

पद्मश्री पुरस्कारांच्या महाराष्ट्रातल्या मान्यवरांमध्ये क्रिकेटपटू रोहित शर्मा तर नवजात बालक चिकित्सातज्ज्ञ अर्मिडा फर्नांडिस यांचा समावेश होता. अभिनेता आर. माधवन आणि तारपा वादनासाठी प्रसिद्ध असणाऱ्या वारली लोककलावंत भिकल्या लाडक्या धिंडा यांना कलाक्षेत्रातला पद्मश्री पुरस्कार देण्यात आले. उद्योजक डॉ. अशोक खाडे यांना उद्योग क्षेत्रासाठी पद्मश्री देण्यात आली. दिवंगत अभिनेते सतीश शाह यांना जाहीर झालेला पद्मश्री पुरस्कार त्यांच्या बंधूंनी स्वीकारला. यावर्षी एकूण एकशे एकतीस पद्म पुरस्कार जाहीर झाले. यापैकी दोन पद्मविभूषण, 60 पद्मभूषण आणि 56 पद्मश्री आज वितरीत करण्यात आले.

**<><><><><>**

राज्यातल्या प्रत्येक पोलीस ठाण्यात अंमली पदार्थविरोधी कृती दलाची स्थापना करू, असं आश्वासन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासात दिलं. या कृती दलात उत्तमोत्तम अधिकाऱ्यांची नियुक्ती केली जाईल, त्यांना भ्रष्टाचारविरोधी पथक आणि नक्षलविरोधी पथकाप्रमाणे भत्ते आणि पदोन्नती दिली जाईल असं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं.

**होल्ड बाईट सीएम**

ज्या पोलीस ठाण्याच्या हद्दीत जास्त अंमली पदार्थ सापडतील तिथल्या पोलीस निरीक्षकावर कारवाई करण्याचा इशारा मुख्यमंत्र्यांनी दिला.

एप्रिल २०२६ पर्यंत राज्यात अंमली पदार्थ बाळगल्याप्रकरणी १ हजार १४२ गुन्हे दाखल झाले, त्यापैकी १ हजार ६२६ आरोपींना अटक झाली. त्यात २५४ कोटी रुपयांचे अंमली पदार्थ जप्त झाले असून अंमली पदार्थ सेवन करणाऱ्यांविरुद्ध ३ हजार १९९ गुन्हे दाखल झाल्याची माहिती सरकारने लेखी उत्तरात दिली. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते जयंत पाटील यांनी यासंदर्भात प्रश्न उपस्थित केला होता.

**विदर्भातल्या** प्रत्येक जिल्ह्यात व्याघ्र प्रकल्प तसंच कोकण, पश्चिम महाराष्ट्र आणि खानदेशातील प्रत्येक जिल्ह्यात बिबट्या सफारी सुरू करण्याची घोषणा वन मंत्री गणेश नाईक यांनी विधानसभेत लक्षवेधीच्या दरम्यान केली. काही वाघ घेऊन जाण्याची विनंती गुजरातमधल्या वनतारा केंद्राला केली आहे. आपल्याकडे पुरेशी जागा झाल्यावर ते वाघ परत आणले जातील असं त्यांनी सांगितलं. वन्यजीवांच्या हल्ल्यात मृत्यूमुखी पडलेल्या नागरिकांच्या कुटुंबातल्या सदस्यांना कायमस्वरूपी नोकरी देण्याचा प्रस्ताव लवकरच मंत्रिमंडळाच्या समोर सादर केला जाईल असं आश्वासन नाईक यांनी दिलं.

**त्याचप्रमाणे** समान नागरी कायदा लागू करण्यासाठी आवश्यक विधेयकाचा मसुदा तयार करण्यासाठी उच्च न्यायालयाच्या सेवानिवृत्त न्यायाधीशांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला असल्याची माहिती गृह राज्यमंत्री योगेश कदम यांनी आज विधानसभेत लक्षवेधीच्या दरम्यान दिली.

**दरम्यान,** पावसाळी अधिवेशनासाठी योगेश सागर, समीर कुणावार, अर्जुन खोतकर, समाधान अवताडे , प्रतापराव पाटील चिखलीकर, सुनील शेळके, राजीव खरे, कैलास पाटील, हेमंत ओगले यांची तालिका अध्यक्ष म्हणून नियुक्ती केल्याची घोषणा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी सभागृहात केली.

**<><><><><>**

मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांच्याकडील काही खात्यांच्या प्रश्नांची उत्तरं देण्यासाठी प्रभारी मंत्र्यांची घोषणा विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी केली. त्यावर विरोधकांनी आक्षेप घेतला. आधीच्या काळात हे होत नव्हतं असा दावा विरोधकांनी केला. मात्र यापूर्वीच्या सरकारच्या काळात देखील प्रभारी मंत्र्यांची नेमणूक होत होती आणि हे संविधानाच्या अनुसार असल्याचं नार्वेकर म्हणाले.

अध्यक्षांच्या उत्तरानं समाधान न झाल्यानं विरोधी पक्षाच्या सदस्यांनी सभात्याग केला.

**<><><><><>**

विधानपरिषदेच्या नवनिर्वाचित सदस्यांचा शपथविधी आज झाला. प्राजक्त तनपुरे, रवींद्र फाटक, अनिकेत तटकरे, दुष्यंत चतुर्वेदी, विक्रम काकडे, अरुण लखानी, बसवराज पाटील, प्रवीण पोटे, अमरनाथ राजूरकर, राजेंद्र राऊत, धैर्यशील कदम, गोकुळ गीते, राजीव पोतदार, अविनाश ब्राह्मणकर, नंदकिशोर महाजन आणि सुहास शिरसाट यांना सभापती राम शिंदे यांनी सदस्यत्वाची शपथ दिली.

राज्य सरकारी कर्मचाऱ्यांप्रमाणे एसटी कर्मचाऱ्यांचा महागाई भत्ता ५३ टक्क्यावरून ५८ टक्के करायचा निर्णय घेतल्याची घोषणा परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी आज विधानपरिषदेत केली. तर वार्षिक वेतनवाढीचा दर २ वरून ३ टक्के करायची घोषणाही त्यांनी केली. यानंतर २९ जून रोजी एसटी कर्मचाऱ्यांनी पुकारलेलं धरणं आंदोलन मागे घेतल्याचं सरनाईक यांनी जाहीर केलं.

दूध आणि दुग्धजन्य पदार्थांमध्ये होणारी भेसळ रोखण्यासाठी दूधभेसळ अधिनियम तयार करायचं काम सुरू असून त्यात भेसळीच्या गंभीरतेनुसार ६ महिने ते आजन्म तुरुंगवास आणि १० लाख रुपयांच्या दंडाची तरतूद प्रस्तावित आहे, अशी माहिती अन्न आणि औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ यांनी आज विधानपरिषदेत दिली.

**मुंबईत** पागडी इमारतींमध्ये राहणाऱ्या सुमारे ४ लाख लोकांना पक्की, सुरक्षित घरं उपलब्ध करून देण्यासाठी वचनबद्ध आहे, अशी ग्वाही मंत्री शंभुराज देसाई यांनी आज सभागृहात दिली.

**तर वडाळा-**ठाणे-कासारवडवली मेट्रो-४ मार्गिकेच्या कामादरम्यान मुलुंड पश्चिम इथं संरक्षण कठडा कोसळून एकाचा मृत्यू, तर तिघे जखमी झाल्याप्रकरणी

सल्लागार कंपनीच्या दोन आणि कंत्राटदाराच्या तीन अशा ५ जणांना अटक केली असून कंत्राटदाराला ५ कोटी रुपये, तर सल्लागाराला १ कोटी रुपयांचा दंड ठोठावण्यात आला आहे, अशी माहिती उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज लेखी उत्तराद्वारे विधानपरिषदेत दिली.

**<><><><><>**

नेदरलँडच्या राणी मॅक्सिमा यांनी आपल्या तीन दिवसांच्या भारत दौऱ्यात आज मुंबईत कुलाबा इथं एचसीजी कॅन्सर हॉस्पिटलला भेट दिली. संयुक्त राष्ट्रांच्या विशेष दूत म्हणून आलेल्या राणी मॅक्सिमा यांनी आरोग्य कर्मचाऱ्यांशी संवाद साधून भारताची यूपीआय यंत्रणा आणि पगारदारांशी जोडलेली फिनटेक ॲप्स लोकांचं आर्थिक जीवन सुधारण्यासाठी कशी मदत करतात, हे समजून घेतलं. भारतानं डिजिटल क्षेत्रात अप्रतिम काम केलं असून नवीन तंत्रज्ञानामुळे लोकांना तात्काळ खर्चासाठी मदत होत असल्याचं त्यांनी सांगितलं. राणी मॅक्सिमा उद्या रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर संजय मल्होत्रा यांची भेट घेणार असून, त्यानंतर त्या दिल्लीला रवाना होतील.

**<><><><><>**

राज्यात आज अनेक ठिकाणी पावसानं हजेरी लावली.

**रत्नागिरी** जिल्ह्यात आज दमदार पाऊस झाला. त्यामुळे काही ठिकाणी झाडं पडली तर काही ठिकाणी महामार्गावर पाणी साचलं होतं. रत्नागिरी तालुक्यात कालपासून अधूनमधून जोरदार सरी कोसळत असल्यानं जनजीवन विस्कळीत झालं.

**नाशिक** शहर आणि परिसरात आज दुपारी तासभर जोरदार सरी बरसल्या. त्यामुळे गेल्या महिनाभरापासून पावसाची आतुरतेनं वाट बघणारे नाशिककर सुखावले.

**सातारा** जिल्ह्याच्या पश्चिम भागात आज दुपारपासूनच पावसाची संतत धार सुरु आहे. **पालघर** जिल्ह्याच्या विविध भागात आज सकाळपासूनच हलक्या ते मध्यम

स्वरूपाचा पाऊस सुरू आहे. दिवसभर अधूनमधून सुरू असलेल्या या पावसामुळे नागरिकांची उकाड्यापासून सुटका झाली.

**<><><><><>**

नैऋत्य मोसमी पाऊस मुंबईसह राज्याच्या आणखी काही भागांमध्ये दाखल झाला. नेहमीच्या ११ जून या तारखेपेक्षा यंदा मान्सून १२ दिवस उशिरा मुंबईत पोहोचला आहे. मान्सूनचे सर्वात लवकर आगमन गेल्या वर्षी २६ मे रोजी म्हणजे सामान्य वेळेपेक्षा तब्बल १६ दिवस आधी झाले. गेल्या काही वर्षांत मुंबईत मान्सूनच्या आगमनाचा पॅटर्न बदलला असून, तो मे महिन्याच्या शेवटच्या आठवड्यापासून ते थेट जूनच्या अखेरपर्यंत कधीही सक्रिय होऊ शकतो, असं या नोंदींवरून दिसतं. हवामान विभागाच्या १९५० ते २०२६ या कालावधीतल्या नोंदींवर नजर टाकल्यास या तारखांमध्ये मोठी अनिश्चितता आणि अनपेक्षित बदल दिसतात.   कोकणात काही ठिकाणी कालपासून जोरदार तर तुरळक ठिकाणी अति जोरदार पाऊस पडला. तसंच मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यातही मुसळधार पावसानं हजेरी लावली. विदर्भात तुरळक ठिकाणी तीव्र ते अतितीव्र उष्णतेची लाट होती.  येत्या दोन दिवसात कोकणात बहुतांश ठिकाणी विजांचा कडकडाट आणि मेघगर्जनेसह पावसाची शक्यता आहे. मध्य महाराष्ट्रात अनेक ठिकाणी, मराठवाड्यात बऱ्याच ठिकाणी आणि विदर्भात काही ठिकाणी पाऊस पडेल, असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

**//<><><><><>//**